**वस्त्रोद्योग धोरण २०११-२०१७ अंतर्गत केंद्र पुरस्कृत TUFS योजनेशी निगडीत दीर्घ मुदती कर्जावर व्याज सवलत योजना.**

**महाराष्ट्र शासन**
**सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग,**
**शासन शुध्दीपत्रक क्रमांक धोरण-२०१२/प्र.क्र.१/टेक्स-२**
**मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.**
**दिनांक : १२ मार्च, २०१२.**

वाचा :-१. शासन निर्णय क्रमांक धोरण-२०११/प्र.क्र.१/टेक्स-२ दिनांक १ मार्च, २०१२

**शासन शुध्दीपत्रक :**

वरील विषयाबाबतच्या संदर्भीय शासन निर्णयातील परिच्छेद २(अ) मध्ये "UID क्रमांक पात्र प्रकल्प" या शब्दानंतर"मात्र ज्या यंत्रमाग घटकांनी संदर्भीय अ.क्र.२ येथील दिनांक २८.४.२०११ मधील परिच्छेद ६(iii) अनुसार ५% व्याज सवलतीऐवजी २०% मार्जीन मनी सबसिडीचा लाभ घेण्याचा पर्याय निवडलेला आहे त्या यंत्रमाग घटकाना वस्त्रोद्योग आयुक्त, वस्त्रोद्योग मंत्रालय, भारत सरकार यांचेकडून UID क्रमांक प्राप्त करुन घेण्याची अट राहणार नाही" असे वाचावे.

२. तसेच सदर शासन निर्णयातील परिच्छेद २ नंतर "मात्र ज्या यंत्रमाग घटकांनी केंद्र पुरस्कृत TUFS अंतर्गत ५% व्याज सवलतीऐवजी २०% मार्जीन मनी सवलत घेतली आहे त्या यंत्रमाग घटकाचे प्रकल्पांना ही अट लागू राहणार नाही." असे वाचावे.

३. परिच्छेद १ "इ" नंतर "या योजनेअंतर्गत व्याज सवलतीची गणना करण्यासाठी केंद्र पुरस्कृत TUFS अंतर्गत व्याज योजनेसाठी पात्र असलेली दीर्घ मुदती कर्जाची रक्कम ग्राहय धरण्यात येईल" असे वाचावे.

४. तसेच प्रकल्पाबाबतची online माहिती सादर करणे व अनुज्ञेय सवलतीच्या मागणीसाठी प्रस्तुत शासन निर्णयासोबत जोडलेले फॉर्म "A" व "B" अंतिम नसून राज्य शासनाच्या वेबसाईटवर संबंधीत वित्तीय संस्था / बँकांना उपलब्ध करुन दिलेले फॉर्म "A" आणि "B" हे अंतिम राहतील. वेबसाईटवर उपलब्ध असलेल्या फॉर्ममध्ये माहिती देणे व अनुज्ञेय अनुदानाची मागणी करणे आवश्यक राहील.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशानुसार व नावाने,

( र. मो. आडे )
महाराष्ट्र शासनाचे अवर सचिव

प्रति-

मा.राज्यपाल यांचे सचिव.
मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई.
मा. उपमुख्यमंत्री यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई.
सर्व मा.मंत्री / राज्यमंत्री (खाजगी सचिवामार्फत), मंत्रालय,मुंबई.

Minutes reg meeting of Bank on 6March12.lwn

मा.मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई.
सर्व अप्पर मुख्य सचिव / प्रधान सचिव /सचिव, मंत्रालय, मुंबई.
सर्व मंत्रालयीन विभाग.
सर्व विभागीय आयुक्त.
सर्व जिल्हाधिकारी.
वस्त्रोद्योग आयुक्त, भारत सरकार, मुंबई.
संचालक (वस्त्रोद्योग), वस्त्रोद्योग संचालनालय, नागपूर.
महासंचालक, माहिती व प्रसिध्दी संचालनालय, मंत्रालय, मुंबई.
महालेखापाल, लेखा व अनुज्ञेयता, महाराष्ट्र-१, मुंबई.
महालेखापाल, लेखा परिक्षा, महाराष्ट्र-१, मुंबई.
महालेखापाल, लेखा व अनुज्ञेयता, महाराष्ट्र-२, नागपूर.
महालेखापाल, लेखा परिक्षा, महाराष्ट्र-२, नागपूर.
सर्व जिल्हा उद्योग अधिकारी.
अध्यक्ष / मुख्य व्यवस्थापकीय संचालक,आय.डी.बी.आय. बँक, एस.आय.डी.बी.आय.बँक व केंद्र पुरस्कृत TUF योजनेअंतर्गत सर्व नोडल बँक.
निवड नस्ती (टेक्स-२)